माझ्या खिश्यामध्ये




डोरिथ एम. सिमो

मराठी: अश्विनी बर्वे

१९३९ मध्ये जर्मनीतून लहान मुलांनी भरलेली एक रेल्वेगाडी निघाली होती. त्यात एक लहान मुलगी तिच्या खेळण्यातील कुत्र्याला धरून एकटी उभी आहे. तिचे आई-वडील तिला सांगतात, "चांगली वागायला विसरू नकोस. आपण लवकरच एकत्र येऊ." ते तिला सांगतात की स्कॉटलंडमध्ये सर्व काही सुरक्षित असेल. पण ते तिला हे सांगत नाहीत की आयुष्य बदलले आहे—आता त्यांच्या घरात त्यांचे स्वागत नाही.

युद्धकाळातील या प्रामाणिक, आत्मचरित्रात्मक आणि लहान मुलांच्या दृष्टीतून ही कथा सांगितली आहे. डॉरिथ एम. सिम यांनी दुसऱ्या महायुद्धादरम्यान एक जर्मन ज्यू निर्वासित म्हणून अनुभव घेतला होता. त्यांच्या स्वतःच्या अनुभवांचा आधारया कथेला आहे. एका लहान मुलीच्या आठवणी यात आहेत. जेराल्ड फिट्झगेराल्ड यांनी संवेदनशील चित्रांमधून चित्रित केली आहे.




२६ जुलै रोजी, जेव्हा माझ्या व्हिसावर शिक्का मारला गेला, तेव्हा मी साडेसात वर्षांची होते. दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीपर्यंत, म्हणजेच ३ सप्टेंबर १९३९ पर्यंत, नाझी युरोपमधून आयोजित 'किंडरट्रान्सपोर्ट'च्या माध्यमातून जवळपास दहा हजार मुले ब्रिटनला पळून आली होती. आम्ही काहीही चुकीचे केले नव्हते, पण आमच्यापैकी बहुतेक जण ज्यू होते आणि आम्ही आमच्या घरातही सुरक्षित नव्हतो. स्कॉटलंडमध्ये, मी इंग्रजी, नवीन चालीरीती आणि जगण्याची एक नवीन पद्धत शिकले. युद्धानंतर, मी माझ्या आई-वडिलांच्या बातमीसाठी आतुर झाले होते. मला खूप काळ वाट पाहावी लागली. दुर्दैवाने, अनेक मुलांना त्यांच्या आई-वडिलांना पुन्हा कधीच पाहता आले नाही. पन्नास वर्षांनंतरही, जे घडले त्याबद्दल इतरांना शिक्षित करण्यासाठी आणि कुटुंबातील सदस्यांना एकमेकांना शोधण्यात मदत करणे सुरू ठेवण्यासाठी, अनेक वेगवेगळ्या देशांमध्ये 'किंडरट्रान्सपोर्ट' गट आजही एकत्र येतात.

माझ्या खिश्यामध्ये



डोरिथ एम. सिमो
मराठी: अश्विनी बर्वे





त्या सकाळी बोटीवरच्या जवळजवळ कोणीच नाश्ता केला नव्हता. ते १९३९ साल होतं. तो जुलै महिना होता. आणि मी एका बोटीवर होते. धोक्यातून सुटका करून घेणाऱ्या मुलांनी भरलेल्या बोटीवर.



हॅम्बर्ग रेल्वे स्टेशनवर आम्हाला हॉलंडला, बोटीकडे घेऊन जाण्यासाठी एक ट्रेन वाट पाहत होती. मुट्टी आणि वाटीने मला सांगितले की ती बोट आम्हाला एका नवीन आयुष्याकडे घेऊन जाईल.

आई-वडील रडले.

आम्हीसुद्धा रडलो.





माझा खेळण्यातील कुत्रा खाली पडला. तो रुळांवर पडला होता. एका माणसाने माझ्या कुत्र्याला वाचवले. त्याने "पकड!" असे ओरडून त्याला माझ्याकडे फेकले. मी त्याला पकडल्यानंतर लगेचच ट्रेन सुरू झाली. मी रडायचे थांबवले आणि माझ्या कुत्र्याला घट्ट मिठी मारून निरोप दिला.





शेवटी, ट्रेन थांबली. एक मोठा मुलगा म्हणाला की आपण हॉलंडमध्ये आहोत. आम्ही एका हिरव्यागार शेतात बसलो आणि चीज सँडविच खाल्ले. आम्हाला मदत करणाऱ्या डच लोकांसाठी आम्ही गाणी गायली. त्यातील एक गाणे जलपरीबद्दल होते. त्यांनी आम्हाला दूध आणि चॉकलेट दिले. लवकरच आम्ही पुन्हा आमच्या प्रवासाला निघालो.






बोटीवर, आई-वडिलांशिवाय झोपणे विचित्र वाटत होते. फक्त भाऊ-
बहिणीच एकमेकांना ओळखत होते. रात्री, काही मुले हरवली.
ती स्वच्छतागृहे शोधण्यासाठी आपापल्या केबिनमधून बाहेर पडली,
आणि त्यांना परत येण्याचा मार्ग आठवत नव्हता.






मग होडीतून उतरण्याची वेळ झाली. आम्ही गळ्यात नावाची पाटी घातली होती. तिथे एक लाकडी पूल होता. फळ्यांमधून समुद्राकडे बघून मला गरगरू लागले. मला हलायचे नव्हते, पण मागच्या सगळ्यांनी मला ढकलले. मी डोळे मिटून घेतले आणि रेलिंग धरले. मी डोळे मिटूनच पुढे सरकले. शेवटी माझे पाय जमिनीला टेकले. तेव्हाच मी रडायला लागले.



एक ट्रेन तयार उभी होती. कोणीतरी म्हणाले की ही ब्रिटिश ट्रेन असून आम्हाला लंडनला घेऊन जात आहे. स्टेशनवर बरेच लोक होते. काही मुलांना भेटायला त्यांचे मित्र किंवा कुटुंबीय आले होते. इतर लोक मदतीसाठी आजूबाजूला पाहत होते. तिथे कॅमेरे घेतलेले पुरुष आणि फोटो घेतलेले लोक होते. त्या लोकांनी मुलांना आपल्या घरी घेण्याचे वचन दिले होते. जोपर्यंत ती मुले पुन्हा त्यांच्या आई-वडिलांसोबत राहू शकत नाहीत, तोपर्यंत ती त्यांच्या कुटुंबाचा भाग बनणार होती.



एक पुरुष आणि एक स्त्री एका छायाचित्राकडे पाहत होते. पत्नीने नवऱ्याच्या हाताला स्पर्श करत म्हटले, "बघा. केसांत केड रिबन लावलेली मुलगी आणि मोठा खेळण्यातील कुत्रा." अशाप्रकारे त्यांनी मला शोधले.

त्यांच्यासोबत असलेला एक माणूस जर्मन बोलत होता. तो म्हणाला, "विलकोमेन शॉन किंड." ते जोडपे इंग्रजी बोलत होते.

मी फक्त एवढंच म्हणू शकले, "माझ्या खिशात एक रुमाल आहे." अशाप्रकारे मी स्वतःलानवीन भाषा शिकवायला सुरुवात केली. जेव्हा जेव्हा मी एखादा नवीन शब्द शिकायचे, तेव्हा मी तो वेगवेगळ्या वाक्यात वापरायचे. जसे की "माझ्या खिशात एक कुत्रा आहे."

"माझ्या खिशात एक घर आहे."


"माझ्या खिशात एक शिक्षक आहे."






तो पुरुष आणि स्त्री स्कॉटलंडहून आले होते. तिथे सगळंच वेगळं होतं. जर्मनीमध्ये, मी माझ्या वडिलांच्या सायकलवरच्या एका लहानशा सीटवर बसायचे.

ते जिथे राहत होते त्या एडिनबर्गमध्ये गाडी होती. आणि माझ्याकडे एक खराखुरा कुत्रा होता.







जर्मनीमध्ये, मी ज्यू असल्यामुळे आमच्या रस्त्यावर इतर मुलांसोबत खेळू शकत नव्हते. आता मी माझ्या नवीन स्कॉटिश मित्रांसोबत खेळायचे.लवकरच मी त्या स्त्री आणि पुरुषाला मम्मी आणि डॅडी म्हणू लागले. मी मुट्टी आणि वाटी यांना माझ्या खऱ्या आई-वडिलांसाठी जपून ठेवलं.

.मला मुट्टी आणि वाटीकडून एक पत्र आलं. "आम्हाला तुझी खूप आठवण येते. चांगला वागायला विसरू नकोस. आणि आम्हाला पत्र लिहायला विसरू नकोस. आज सकाळी आम्ही मशरूम गोळा केले आणि तुझी आठवण काढली. आम्ही लवकरच तुझ्यासोबत असू अशी आशा आहे.“

"मलाही तशीच आशा होती.“ मी मुट्टी आणि वाटीचं पत्र जपून ठेवलं. मी ते रोज वाचायचो. जोपर्यंत युद्ध संपलं नाही, तोपर्यंत मी ते माझ्या खिशात सुरक्षित ठेवलं होतं.

समाप्त

